REVIEW OF RESEARCH

# जि.प. प्रा.शा. टिकेकरवाडी या शाळेतील इयत्ता सातवीच्या कन्नड भाषिक विद्यार्थ्यांना मराठीच्या वाचन - लेखनात येणाऱ्या अडचणी शोधून त्यावरील उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे

मंजू विठ्ठल यादव

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## १. प्रस्तावना :-

बदलत्या काळानुसार नव्या ज्ञानाची, नव्या अनुभवाची, नव्या शोधाची, नव्या विचार करण्याची प्रवृत्ती, नव्या कल्पना ओळखून आपली कार्यशैली ठरवणे ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. संशोधकाने आपल्या व्यवसायातील समस्या स्वत: सोडविण्याचा केलेला शास्त्रीय प्रयत्न म्हणजे कृतिसंशोधन होय. अध्ययन - अध्यापनातील नेमक्या कोणत्या समस्या आहेत ? त्या समस्या निर्मितीमागे कोणते घटक कारणीभूत आहेत. हे जाणून घेण्याची जिज्ञासा संशोधकामध्ये निर्माण झाली. त्याचप्रमाणे इंग्रजी व कन्नड माध्यम शाळेत सुद्धा मराठी भाषेला फार महत्व प्राप्त झालेले आहे. परंतु आज शाळेतील प्राथमिक स्तरावरील इयत्ता सातवीच्या कन्नड भाषिक विद्यार्थ्यांचा विचार केला तर त्याच्या मराठी लेखनात , वाचनात आणि बोलण्यात चुका दिसून येतात. विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्ययन करताना अडचणी येत आहेत. त्या अडचणींचा अभ्यास करणे या ठिकाणी गरजेचे वाटले.

## २. संशोधनाची गरज :-

अध्यापन करत असताना कन्नड भाषिक विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे वाचन - लेखन करताना खालील अडचणी शिक्षकांना जाणवल्या.

१. हेल काढून - एकाच सुरात वाचणे. उदा. भ ऐवजी ब, फ ऐवजी प, ख ऐवजी क वाचणे.
२. ऱ्हस्व - दीर्घ इकार व ऊकार यांचे चुकीचे उच्चारण करणे .
३. विरामचिन्हांचा विचार न करता वाचणे.
४. अर्थाचे आकलन न करता वाचणे.
५. अशुद्ध वा अप्रमाणित उच्चार करून वाचणे.
६. शब्दांची वा अक्षरांची उलटापलटा करून वाचणे.
७. धीम्या गतीने वाचणे.
८.अक्षरे चुकीची लिहिणे.
९. विरामचिन्हे न देणे. इ.

## ३. संशोधन समस्येचे शीर्षक :-

**जि.प. प्रा.शा. टिकेकरवाडी या शाळेतील इयत्ता सातवीच्या कन्नड भाषिक विद्यार्थ्यांना मराठीच्या वाचन - लेखनात येणाऱ्या अडचणी शोधून त्यावरील उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे**

## ४. संशोधनाची उद्दिष्टे :-

१. जि.प. प्रा.शा. टिकेकरवाडी या शाळेमधील इ. ७वीच्या कन्नड भाषिक विद्यार्थ्यांना मराठीच्या वाचन- लेखनात येणाऱ्या अडचणींच्या कारणांचा शोध घेणे.
२. इ. ७वीच्या कन्नड भाषिक विद्यार्थ्यांना मराठी वाचन- लेखन येण्यासाठी उपायांची अंमलबजावणी करणे.
३. राबवलेल्या उपायांची परिणामकारकता अभ्यासणे.

## ५. संशोधन परिकल्पना :-

विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखनामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपचारात्मक कार्यक्रमांमुळे त्यांच्या वाचन- लेखनात सुधारणा फरक पडणार नाही.

## ६ .अभिकल्प निवड :

**समान गट उत्तर चाचणी अभिकल्प :-**
प्रस्तुत संशोधनासाठी प्रयोगासाठी **समान गट उत्तर चाचणी अभिकल्प** या अभिकल्पाची निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी उपचारात्मक अध्यापनाची निर्मिती करण्यात आली होती. सदरील उपक्रम शाळेमध्ये एक महिन्याच्या कालावधीत व्यवस्थितरित्या राबवण्यात आला . सदरील उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या समस्यावर उपाययोजना करण्यात आली.

## ७. संशोधन पद्धतीची निवड :-

सदर संशोधनात प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

## ८. संशोधनासाठी साधने व तंत्रे :-

शिक्षक निर्मित संपादन चाचणीचा उपयोग केलेला आहे.

## ९. संशोधनासाठी नमुना निवड :-

प्रथम सत्र परिक्षेत मराठीच्या वाचन- लेखन कौशल्यात मागे पडणाऱ्या पंधरा विद्यार्थ्यांची निवड सहेतूक नमुना निवड

LBP PUBLICATION

१०. पध्दतीने करण्यात आलेली आहे.

### ११. उपाययोजना उपक्रम :

- साप्ताहिक एखादा दिवस वाचनदिन परिपाठातून कथा , बातम्या , सुविचार , गोष्ट सांगणे.
- प्रश्नमंजूषा , सामान्य ज्ञानाचे प्रश्न तसेच विषयाज्ञानासंबंधी प्रश्नोत्तरे
- प्रसंगानुरूप विषय देऊन बोलण्याची संधी उपलब्ध करून देणे.

### अ) अध्यापन :-

अध्यापनामध्ये प्रथम अक्षरांचे बाराखडीचे, शब्दाचे , वाक्याचे या क्रमाने वाचन व अनुलेखन सराव घेण्यात आला . त्यानंतर अक्षराचे , सोप्या शब्दांचे, जोडशब्दाचे व वाक्याचे क्रमानुसार लेखन सराव घेण्यात आला.

### ब) संगणकाचा वापर :

मराठीच्या अध्यापनासाठी संगणकाचा वापर करण्यात आला. शैक्षणिक सी.डी.जचा वापर करण्यात आला. तसेच Internet वरील you tube वरून videoclips download करून ते विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. तसेच

### क) गटकार्य :-

संशोधकाच्या अध्यापनानंतर व विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक सरावानंतर विद्यार्थ्यांना शिकविलेल्या घटकांवर आधारित गटकार्य दिले जाई. प्रत्येक विद्यार्थ्यांकडून गटकार्य करून घेतले तसेच वैयक्तिक सराव ही घेतला. शक्य त्या पाठाच्या वेळी ppt चा वापर करून अध्यापन करणे.

**१. पूर्व चाचणी :-** संशोधकाने लेखन करता न येणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी पूर्व चाचणी घेतले . पूर्व चाचणीतून किती व कोणते विद्यार्थी लेखन करू शकत नाहीत याचा शोध घेण्यात आली. पूर्वचाचणी सोप्याकडून कठीणाकडे या सुत्रानुसार घेण्यात आली. लेखन कौशल्यातील सर्व घटकांचा विचार करून व सर्व घटकांना समान भारांश देऊन चाचणी तयार करण्यात आली.

**२. अंतिम चाचणी :-** पूर्व चाचणीचे मूल्यमापन केल्यानंतर काही तज्ज्ञांशी, मार्गदर्शकांशी चर्चा केली. लेखन कौशल्यातील सर्व घटकांचा विचार करून उपक्रमांची योजना केली. उपक्रमांची परिणामकारकता पाहण्यासाठी अंतिम चाचणी घेतली.

कृतिसंशोधन ठरविल्याप्रमाणे होण्यासाठी पूर्व चाचणीतील निरीक्षण व सर्वेक्षणातून १५ विद्यार्थी निवडले . प्रत्येक गटात ३-३ विद्यार्थी याप्रमाणे ५ गटाची निर्मिती केली. या विद्यार्थ्यांसाठी उपक्रमाची कार्यवाही करण्याचे ठरविले . प्रथमतः विद्यार्थ्यांसाठी उपक्रमासाठी शालेय वेळाव्यतिरिक्त वेळ दयायचा हे ठरवून यासाठी वेळेचे नियोजन करून घेतले .

### निष्कर्ष :

जेव्हा पूर्व चाचणी व उत्तर चाचणीच्या मध्यमानाची तुलना केली तेव्हा असे दिसून आले की, उत्तर चाचणीचे मध्यमान हे पूर्व चाचणीच्या मध्यमानापेक्षा १.८६ ने जास्त आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखनामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपचारात्मक कार्यक्रमांमुळे त्यांच्या वाचन- लेखनात सुधारणा फरक पडणार नाही या शून्य परिकल्पनेचा त्याग करून विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखनामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपचारात्मक कार्यक्रमांमुळे त्यांच्या वाचन- लेखन मध्यमान गुणांकात फरक पडतो ही परिकल्पना स्वीकारावी लागेल.

याचा अर्थ असा की विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखनामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपचारात्मक कार्यक्रमांमुळे त्यांच्या वाचन-लेखन मध्यमान गुणांकात पडलेला फरक (१.८६ गुणांकांचा) खरा आहे, तो केवळ योगायोगाचा परिणाम नाही. सारांश , विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखनामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपचारात्मक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांची संपादणूक वाढते.